**स्थायी निदेश क्र. १८-२०२५**

**नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणा-या सेवा आर्थिकदृष्टया तुटीत असल्याने इतर तुट भरुन काढल्याचा अहवाल वार्षिक अर्थ-संकल्पासोबत सादर करणे व त्याच्या परिगणनाबाबतच्या पध्दतबाबत सुधारीत मार्गदर्शन.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रस/प्र.क्र.१८/स्थायी नि./१८/२०२५/न.प.आ.तू.वा.अर्थ.सा.क.व परि./कक्ष-१२/1280**
**दिनांक -:** 17 FEB 2025

**संदर्भ:-**

१) या संचालनालयाकडील पत्र क्र. संकीर्ण-२००१/प्र.क्र. ८/२००१/२ ,दिनांक १५ जानेवारी, २००१.

२) या संचालनालयाकडील क्र. १२ संकीर्ण-२००१/प्र.क्र.४/२००१/२४६ ,दिनांक १० एप्रिल, २००१.

**प्रस्तावना:-**

प्रत्येक नगरपरिषदेमध्ये दरवर्षी अर्थसंकल्प कशा प्रकारे तयार केला जावा आणि कशा प्रकारे त्यास मान्यता दिली जावी, याबद्दलची तरतुद महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ खालील कलम १०१ मध्ये विहीत करण्यांत आलेली आहे. उक्त कलम १०१ मधील पोटकलम( १ अ) अनुसार अर्थसंकल्प विवरण पत्र सोबत पाणीपुरवठा व मलनि:सारण संबंधी, गटारे साफ करणे, घन कचऱ्याची वाहतुक आणि विल्हेवाट संबंधी, नगरपरिषद परिवहन संबंधी, रस्त्यांवरील दिवाबत्ती संबंधी पुढील तरतुदी अंतर्भूत असलेले विवरण पत्र मुख्याधिकारी यांनी सादर करणे बंधनकारक आहे.

१. उक्त कलमामध्ये नमूद ४ सेवा अर्थसहाय्य देऊन पुरविण्यात आले होते का?
२. उक्त कलमामध्ये नमूद ४ सेवा साठी अर्थसहाय्य देण्यात आले असल्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्य ची मर्यादा किती होती?
३. उक्त कलमामध्ये नमूद ४ सेवा साठी ज्या साधान्यतून अर्थसहाय्य देण्यात आले ते साधन कोणते?
४. स्थानिक लोकसमुदायाचे जे भाग किंवा वर्ग अशा अर्थसहाय्यचे लाभकरी होते ते भाग किंवा वर्ग कोणते?

यापुर्वी स्थायी निदेश क्र. ९ हा नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणा-या सेवा आर्थिकदृष्टया तुटीत असल्याने इतर तुट भरुन काढल्याचा अहवाल वार्षिक अर्थसंकल्पासोबत सादर करणे याबाबतीत होता. तसेच स्थायी निदेश क्र. १२ हा नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा आर्थिकदृष्टया तुटीत असल्याने इतर तुट भरुन काढल्याचा अहवाल वार्षिक अर्थसंकल्पासोबत सादर करणे - परिगणनाची पध्दती याबाबतीत होता.

याबद्दलचा अहवाल सादर करणे ही मुख्याधिकाऱ्यांची वैधानिक जबाबदारी आहे. या वैधानिक कर्तव्याकडे नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे आणि काही अपवाद नगरपरिषदामध्ये अर्थसंकल्प सादर करताना (कलम १०१अ) मधील तरतुदीनुसार अनुदानाचा अहवाल तयार केला जात नाही व अर्थसंकल्पासोबत सादर केला जात नाही.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे होत असलेली कार्यवाही कायद्यातील तरतुदीप्रमाणे परिपूर्ण अशी नाही आणि त्यामुळे कोणकोणत्या नगरपरिषदांमध्ये कोणत्या सेवांसाठी किती प्रमाणात खर्च व उत्पन्न यामध्ये तूट रहाते आणि ती तूट भरुन काढण्यासाठी नगरपरिषदांना आपापल्या इतर उत्पन्नातून किती प्रमाणात अनुदान खर्च करावा लागत आहे. अशा प्रकारची वस्तुनिष्ठ कल्पना समोर येत नाही त्यामुळे अशा सेवा आर्थिक दृष्टया स्वयंनिर्भर करण्यासाठी नागरीकांकडून घेतल्या जाणाऱ्या करांमध्ये योग्य सुधारणा केली जात नाही.

याशिवाय कायद्यातील असलेल्या वैधानिक तरतुदींचे सर्रासपणे उल्लंघन होत आहे, असे स्पष्ट होते. नगरपरिषदेच्या कामामध्ये अशा प्रकारची उणिव यापुढे राहू नये याकरिता तसेच सध्या नगरपरिषदांच्या उत्पन्नाच्या काही बाबींमध्ये व खर्चाच्या काही बाबींमध्ये बदल झाला आहे. उदा. घनकचऱ्याच्या विक्रीतून म्हणजेच खत व सुक्या कचऱ्यातून प्राप्त उत्पन्न व इतर सेवा शुल्क मध्ये उपरोक्त दोन्ही स्थायी निदेश एकत्रित करणे अनिवार्य आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश:-**

**०१ अहवाल**

**अ)** कायद्यातील कलम १०१(अ )प्रमाणे मुख्याधिकाऱ्यानी दरवर्षी अपेक्षित अहवाल अर्थसंकल्पीय प्रस्तावासोबत सादर करण्याची दक्षता घ्यावी. अशा अहवालाचे नगरपरिषदेवर होणारे परिणाम व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबत चर्चा करुन नगरपरिषदेने पुढील कामाकरीता कृती आराखडा ठरवावा आणि अर्थसंकल्प मंजुरीच्या ठरावात हा कृती आराखडा नमुद केला जावा.

**ब)** कलम १०१ (१ अ) प्रमाणे तयार करण्यांत आलेला अहवाल मुख्याधिकाऱ्यांनी नगरपरिषदेसमोर सादर केला नसल्यास अध्यक्षानी अर्थसंकल्पास मंजूरी देण्यापूर्वी तो अहवाल नगरपरिषदेपुढे सादर केला जाईल याची दक्षता घ्यावी व ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच अर्थसंकल्पास मंजूरी घ्यावी.

**क)** नगरपरिषदांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या वरील प्रत्येक सेवेकरिता होणारा खर्च आणि त्या त्या सेवेबाबत सेवा शुल्क म्हणून मिळणारे उत्पन्न विचारात घेतले जावे. अधिनियमातील कलम १०५ अन्वये नागरी भागात असलेल्या मालमत्तांवर एकत्रित कर आकारला जातो. या मालमत्ता करामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१) सर्वसाधारण सेवा कर
२) सर्वसाधारण पाणीपट्टी
३) दिवाबत्ती कर
४) सर्वसाधारण स्वच्छता विषयक कर
५) विशेष स्वच्छता शौचकूप कर
६) अग्नि अग्निशमन कर
७) पर्यावरण कर

८) पाणी पुरवठा लाभ कर
९) मल प्रवाह सुविधा लाभ कर
१०) पथ कर

**ड)** गुंठेवारी नियमतीकरण अंतर्गत प्राप्त होणारे शुल्क

## ०२ अहवाल परिगणना करण्यासाठी पध्दत

### अ) पाणी पुरवठा व जलनि:सारण सेवेबद्दल तूट भरून काढण्याचा अहवाल

| उत्पन्न बाजू | खर्च बाजू |
|---|---|
| पाणी पुरवठयाची सेवा नागरीकांना देत असतांना उत्पन्न म्हणून खालील तीन बाबी विचारात घ्याव्यात व एकूण उत्पन्न परिगणित करावे<br>१. एकत्रित मालमत्ता करापासून व गुंठेवरी नियमती करातून मिळणाऱ्या शूल्कापासून वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी १५% भाग.<br>२. विशेष पाणीपट्टी व्दारे वर्षभरात झालेली वसूली<br>३. नवीन नळ कनेक्शन देताना वसूल झालेले शुल्क | पाणी पुरवठा सेवेवर झालेला खर्च काढताना खालील बाबी विचारात घ्याव्यात<br>१. पाणी पुरवठयाच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा पगार, निवृत्तीवेतन, सेवानिवृत्तीनंतर त्यांना देण्यात येणारे अंशदान, रजा रोखीकरण लागू असल्यास देण्यात येणारे अन्य फायदे.) यामुळे कायमस्वरूपी तूट दिसू शकते, त्यामुळे वगळणे योग्य)<br>२. पाणी पुरवठा योजनेच्या डागडूजी व दुरुस्तीवर झालेला खर्च.<br>३. पाणी पुरवठयामध्ये वापरण्यात आलेल्या रसायने, तुरटी, टी.सी.एल. पावडर इत्यादीवरील खरेदीचा खर्च.<br>४. पाणी पुरवठा योजनेसाठी वापरण्यात आलेल्या वीज बीलांपोटी झालेला खर्च<br>५. पाण्याची ठोक खरेदी झालेली असल्यास, त्यावर झालेला खर्च.<br>६. शहरातील सार्वजनिक कोंडाळी यासाठी विद्युत देखभाल व दुरुस्तीवर झालेला खर्च.<br>७. या योजनेच्या कामासाठी कर्ज घेतले असल्यास, त्या कर्जाच्या परतफेडीसाठी त्या वर्षामध्ये नगरपरिषदेवर पडलेला आर्थिक भार.<br>८. पाणी पुरवठा योजनेच्या सर्व उपंगांकरिता वार्षिक घसारा निधी. |

ज्या नगरपरिषदा भुयार गटाराद्वारे मलनिस्सारणाची सेवा उपलब्ध करुन देतात त्या नगरपरिषदांनी विशेष मलनिस्सारण कराद्वारे मिळालेली वसूली उत्पन्न म्हणूनच विचारात घ्यावे आणि खर्चाची परिगणना करताना भुयारी मलनिस्सारणाच्या सेवेसाठी सर्व बाबींवर झालेला खर्च वरील पध्दतीनुसारच विचारात घ्यावा आणि त्यानुसार परिगणना करावी.

**ब) दिवाबत्ती सेवेबद्दल तुट भरून काढण्याचा अहवाल**

| उत्पन्न बाजू | खर्च बाजू |
|---|---|
| १. सार्वजनिक दिवाबत्तीची सेवा शहरामध्ये उपलब्ध करुन देताना नगरपरिषदेचे उत्पन्न म्हणून स्वतंत्ररित्या सेवाशुल्क सर्वसाधारणपणे वसूल केला जात नाही, म्हणून या सेवेवर प्राप्त झालेले उत्पन्न काढताना आर्थिक वर्षात वसूल झालेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या व गुंठेवरी नियमती करातून मिळणाऱ्या शूल्कापासून १५% भाग या सेवेसाठी मिळालेले उत्पन्न समजण्यात यावे. | २. दिवाबत्तीची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी झालेल्या खर्चाची परिगणना करताना या कामावर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा पगार, निवृत्तीवेतन, सेवानिवृत्तीनंतर त्यांना देण्यात येणारे अंशदान, रजा रोखीकरण लागू असल्यास देण्यात येणारे अंशदान, रजा रोखीकरण लागू असल्यास देण्यात येणारे अन्य फायदे इत्यादीवर सर्व प्रकारचा खर्च,<br>३. नवीन कामे, बल्ब, टयूब वायरिंग, देखभाल व दुरुस्तीवर झालेला खर्च<br>४. दिवाबत्ती करिता वीज मंडळास द्यावी लागणारी रक्कम. |

**क) सर्वसाधारण स्वच्छता विषयक सेवेकरिता तूट भरून काढण्याचा अहवाल**

सर्वसाधारण स्वच्छता सेवा म्हणजेच घनकचऱ्याचे व्यवस्थापन व गटार साफ करण्याची सेवा नगरपरिषदे मार्फत पुरविली जाते. या सेवेकरिता मिळालेल्या उत्पन्न व खर्च परिगणना करताना पुढील विचार करण्यात यावा.

| उत्पन्न बाजू | खर्च बाजू |
|---|---|
| १. वसूल झालेल्या मालमत्ता करापैकी व गुंठेवरी नियमती करातून मिळणाऱ्या शूल्कापासून १५% भाग साफसफाई या सेवेसाठी मिळालेले उत्पन्न समजण्यात यावे.<br>२. खताच्या व सुक्या कचऱ्याच्या विक्रीतुन मिळालेले उत्पन्न हे उत्पन्नाचा भाग समजावे.<br>३. घनकचऱ्यासाठी व भुमीगत गटारीसाठी वसुल झालेला सेवाशुल्क देखील उत्पन्नाचा भाग समजावे. | १. स्वच्छता विषयक कामासाठी असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांवर आस्थापन विषयक बाबींवर झालेला खर्चामुळे कायमस्वरूपी तूट दिसू शकते त्यामुळे वगळणे योग्य)<br>२. साफसफाई कामासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहने व यंत्रावर झालेला खर्च,<br>३. साफसफाई कामासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांकरिता घसारा निधीचा वार्षिक भाग<br>४. फवारणीसाठी खरेदी केलेली जंतुनाशके इत्यांदीवर झालेला खर्च. |

| | |
|---|---|
| ४. प्लॅस्टिक बंदी व अस्वच्छता अनुषंगाने करण्यात आलेल्या शास्तीतून मिळणारी रक्कम उत्पन्नाचा भाग समजावा. | ५. स्वच्छता साहित्य, स्वच्छते संबंधी संरक्षण साधने इत्यादि वर करण्यात येणारा खर्च<br>६. खत निर्मिती करण्यासाठी व सुका काचाऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी येणारा खर्च<br>७. स्वच्छते संबंधी वापरण्यात येणारे वाहन व यंत्र या संबंधी दुरुस्ती खर्च |

**ड) सार्वजनिक परिवहन सेवा अनुदान अहवाल**

| उत्पन्न बाजू | खर्च बाजू |
|---|---|
| या सेवेपासून मिळणारे उत्पन्न म्हणजेच प्रवाशांकडून वसूल झालेले भाडे. | १. या सेवेसाठी झालेल्या खर्चाची परिगणना करताना या कामावर असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे आस्थापना विषयक सर्व बाबींवर झालेला खर्च.<br>२. वाहनांकरिता लागणारी यंत्रसामुग्री<br>३. वाहनांची देखभाल व दुरुस्ती<br>४. नवीन वाहने खरेदी केली असल्यास त्यावर झालेला खर्च<br>५. वाहनांच्या विमा इत्यादीवर खर्च<br>६. वाहनाकरीता घसारा निधीचा वार्षिक भाग |

वरील प्रमाणे सेवा पुरविताना प्रत्येक सेवेपासून मिळालेले उत्पन्न आणि प्रत्येक सेवेवर झालेला एकत्रित खर्च विचारात घेऊन यापैकी कोणकोणत्या सेवा पुरविताना तूट आली किंवा शिलकी राहिली याची परिगणना करावी. ज्या सेवा पुरविण्याबाबत वर्ष अखेरीस शिलकी राहिली असेल तर त्याबाबत तसा स्पष्ट उल्लेख करावा. मात्र तूट राहिली असल्यास प्रत्येक सेवेसंबंधीच्या त्रुटी बद्दल सविस्तर विवरण अहवालात तसे नमूद करावे.

नगरपरिषदेकडून वरील चार प्रकारच्या सेवा तूटीच्या अवस्थेत पुरविल्या गेल्यास म्हणजेच मिळालेल्या उत्पन्नापेक्षा खर्च अधिक प्रमाणात झाला असल्यास त्या तुटीचे प्रमाण नमुद केले जावे व ती तूट भरून काढण्यासाठी नगरपरिषदेच्या इतर कोणत्या उत्पन्नातून सदर तूट भरून काढण्यात आली याचा उल्लेख करावा. शिवाय प्रत्येक सेवेचा लाभ शहरातील कोणकोणत्या वर्गातील लोकांना किंवा घटकांना किती प्रमाणात देण्यात आला आहे याची परिगणना करावी. काही विशिष्ट घटकांकरिता विशेष पाणीपट्टी कर कमी दराने लावला असेल, पाणीपुरवठा सेवा देताना काही सार्वजनिक समस्यांमुळे कोणालाही विशिष्ट विशेष पाणीपट्टी कर आकारणी करण्यात आली नसेल, तर अशा कोणत्या घटकांस किती प्रमाणात इतर नागरीकांपेक्षा अनुदानित सेवा देण्यात आली आहे याचा स्पष्टपणे उल्लेख करावा.

मुख्याधिकारी यांनी उपरोक्त सूचना विचारात घेवून कार्यवाही करावी आणि अशा प्रकारे सादर केलेल्या अहवालाची प्रत दरवर्षी ३१ जुलै पूर्वी आपल्या कडील वार्षिक लेख्यासोबत संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

Manoj Vijay Ranade

Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2025.02.17 13:30:25 +05'30'

**(मनोज रानडे भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

१) मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा , महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,सर्व विभाग.
५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
६) निवड नस्ती

प्रति,

१) जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व ).
२) अध्यक्ष/ प्रशासक , नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
३) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)